ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २३२ • शुक्रवार दि.१२ जून २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## मोदींच्या १२ वर्षांच्या कामगिरीचे फडणवीसांकडून कौतुक



मुंबई/प्रतिनिधी-देशातील सुमारे २५ कोटी नागरिकांना तीव्र गरिबीतून बाहेर काढणे, अन्न सुरक्षा योजनेंतर्गत ८१ कोटी नागरिकांना लाभ देणे, जनधन योजना, लखपती दीदी या सारख्या योजनातून केंद्र सरकारने गेल्या बारा वर्षाच्या सत्तेत सर्वसामान्यांच्या जीवनमानात अमुलाग्र बदल घडविण्यात पंतप्रधान नरेंद्र मोदींना यश आले. असा दावा करीत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या नेतृत्वाची १२ वर्षे पूर्ण करताना माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या सर्वाधिक काळ कार्यरत राहिलेल्या निवडून आलेल्या पंतप्रधानांच्या विक्रमाला मागे टाकल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत मोदी सरकारच्या कामगिरीचा गौरव केला. देशाने आर्थिक, सामाजिक, पायाभूत आणि जागतिक स्तरावर ऐतिहासिक प्रगती साधल्याचा दावा केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांच्या नेतृत्वाखाली भारताची जगातील प्रतिष्ठा आणि ओळख अधिक मजबूत झाली असल्याचे फडणवीस म्हणाले. मोदींना आतापर्यंत ३२ आंतरराष्ट्रीय सन्मान प्राप्त झाले असून त्यापैकी २४ सन्मान हे संबंधित देशांतील सर्वोच्च नागरी पुरस्कार आहेत. देशातील २२ राज्यांमध्ये एनडीएची सत्ता असून सुमारे ८० टक्के लोकसंख्या असलेल्या प्रदेशांवर एनडीएचे शासन असल्याचेही त्यांनी नमूद केले.

देशातील सुमारे २५ कोटी नागरिकांना तीव्र गरिबीतून बाहेर काढण्यात मोदी सरकारला यश आल्याचा दावा करताना फडणवीस म्हणाले की, अन्न सुरक्षा योजनेंतर्गत ८१ कोटी नागरिकांना लाभ मिळत आहे. जनधन योजनेमुळे ३२ कोटी महिलांची बँक खाती सक्रिय झाली असून लखपती दीदी अभियानातून देशातील तीन कोटी महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या आहेत. महाराष्ट्रात हा आकडा ५० लाखांपर्यंत पोहोचल्याचे त्यांनी सांगितले. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत चार कोटी घरे पूर्ण झाली असून आणखी तीन कोटी घरे उभारण्याचे काम सुरू आहे. आरोग्य विमा आणि सामाजिक सुरक्षा योजनांमुळे सर्वसामान्यांच्या जीवनमानात सुधारणा झाल्याचाही दावा त्यांनी केला. पायाभूत सुविधांच्या विकासामुळे देशात मोठे परिवर्तन घडल्याचे त्यांनी सांगितले. देशात दररोज सरासरी ३४ किलोमीटर महामार्ग उभारले जात असून वंदे भारत एक्स्प्रेस, मेट्रो नेटवर्क, विमानतळांचा विस्तार आणि रेल्वेच्या आधुनिकीकरणामुळे वाहतूक क्षेत्रात आमूलाग्र बदल झाला आहे. यूपीआय प्रणालीमुळे भारत डिजिटल व्यवहारांच्या क्षेत्रात जगातील आघाडीच्या देशांमध्ये पोहोचल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्राच्या विकासाबाबत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, गेल्या दहा वर्षांत राज्याला केंद्र सरकारकडून सुमारे १२ लाख कोटी रुपयांचा निधी मिळाला. सिंचन पान ४ वर

## वाढते तापमान वीजेचा लंपडाव, नांदेडकर हैराण

नांदेड/प्रतिनिधी-ऐन पावसाळ्यात उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढत असतांनाच वारंवार वीज खंडीत होत असल्याने नांदेडकर हैराण झाले आहेत.

अलनिनोमुळे पाऊस लांबणीवर पडला आहे. त्यातच प्रचंड उन्हाचा तडाखा आणि वातावरणात उकाडा निर्माण झाला आहे. अशावेळी वीज मंडळाकडून वारंवार वीज खंडीत होत असल्याने नांदेडकर हैराण होत आहेत.




सध्या पावसाळ्याचे दिवस असले तरी नांदेडसह परिसरात तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढत असल्याने शहरातील मुख्य रस्त्यांसह प्रमुख बाजारपेठात दिसणारी नागरिकांची वर्दळ कमी झाली असून दुपारी बारा नंतर रस्त्यावर सर्वत्र शुकशुकाट दिसून येत आहे.

## नीट पुनर्परीक्षेसाठी १९५ मिनिटांचा पेपर

### २१ जूनच्या परीक्षेसाठी एनटीएचा मोठा निर्णय

नवी दिल्ली:नीट-यूजी २०२६ पेपरफुटी प्रकरणानंतर २१ जून रोजी होणाऱ्या पुनर्परीक्षेसंदर्भात नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए)ने विद्यार्थ्यांना मोठा दिलासा दिला आहे. पुनर्परीक्षेचा कालावधी १८० मिनिटांवरून १९५ मिनिटांपर्यंत वाढवण्यात आला असून विद्यार्थ्यांना अतिरिक्त १५० मिनिटांचा वेळ मिळणार आहे. त्यामुळे परीक्षा दुपारी २ ते सायंकाळी ५.१५ या वेळेत होणार आहे.

नीट पेपरफुटीनंतर परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. रद्द झालेल्या परीक्षा आता २१ जून रोजी होणार आहेत. झालेल्या परीक्षा रद्द झाल्यामुळे विद्यार्थ्यांना मानसिक आणि शारीरिक तणावाला सामोरे जावे लागले होते. या पार्श्वभूमीवर अपवादात्मक परिस्थिती लक्षात घेऊन एनटीएकडून हा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच प्रश्नपत्रिकेत रफवर्कसाठी उपलब्ध असलेल्या दोन पानांची संख्या वाढवून चार करण्यात आली आहे. त्यामुळे गणिती आणि वैज्ञानिक गणना करण्यासाठी विद्यार्थ्यांना अधिक जागा उपलब्ध होणार आहे.३ मे रोजी झालेल्या नीट-यूजी परीक्षेवर पेपरफुटीचे सावट आल्याने देशभरात मोठी खळबळ उडाली होती. त्यानंतर परीक्षा रद्द करण्यात आली आणि २१ जून रोजी पुनर्परीक्षा घेण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. यामुळे वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकावरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

**नव्याने नोंदणीची गरज नाही**

एनटीएने स्पष्ट केले आहे की, विद्यार्थ्यांना पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही. यापूर्वी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची माहितीच पुढील प्रक्रियेसाठी वापरण्यात येणार आहे. तसेच आधी भरलेली परीक्षा फी वैध राहणार असून विद्यार्थ्यांना कोणतेही अतिरिक्त शुल्क भरावे लागणार नाही.

**फी परतावा आणि नवीन प्रवेशपत्र**

एनटीएच्या माहितीनुसार, आधी भरलेली परीक्षा फी नियमानुसार विद्यार्थ्यांना परत केली जाणार आहे. पुनर्परीक्षेचा संपूर्ण खर्च एनटीए स्वतःच्या संसाधनांतून उचलणार आहे. तसेच सुधारित वेळापत्रकानुसार विद्यार्थ्यांसाठी नवीन प्रवेशपत्र (ॲडमिट कार्ड) जारी करण्यात येणार असून त्याबाबतची पूर्वसूचना अधिकृत संकेतस्थळावर दिली जाईल.

**परीक्षा केंद्रांबाबत अद्याप निर्णय नाही**

विद्यार्थ्यांनी यापूर्वी दिलेले परीक्षा केंद्रांचे पर्याय एनटीएकडे कायम राहणार आहेत. मात्र, प्रत्यक्षात पूर्वीचेच केंद्र मिळणार की त्यात बदल होणार, याबाबत अद्याप अंतिम निर्णय जाहीर करण्यात आलेला नाही. परिस्थितीनुसार काही केंद्रांमध्ये बदल करण्यात येऊ शकतो.

**अधिकृत संकेतस्थळावर मिळणार सर्व माहिती**

पुनर्परीक्षेचे वेळापत्रक, प्रवेशपत्रे आणि इतर सर्व महत्त्वाच्या सूचना एनटीएच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत घोषणांवर लक्ष ठेवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पेपरफुटी प्रकरणामुळे देशभरात संतापाची लाट उसळली होती. वर्षभर मेहनत घेऊन परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षेला सामोरे जावे लागत असल्याने चिंता व्यक्त केली जात असली, तरी वाढीव वेळ आणि अतिरिक्त सुविधा मिळाल्याने विद्यार्थ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळाल्याचे मानले जात आहे.

## अविश्वासाचा अर्ज जिल्हाधिकाऱ्यांकडे की,जिल्हा उपनिबंधकांकडे?,बाजार समितीत नवा पेच

### जमीन विक्री कांड विरुद्ध एफडी वाद:किनवट बाजार समितीतील राजकारण तापले

किनवट/प्रतिनिधी-कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती विरुद्धचा अविश्वास प्रस्ताव नेमका जिल्हाधिकाऱ्यांकडे दाखल करायचा की, जिल्हा उपनिबंधकांकडे ? संचालकांच्या या गोंधळवाण्या परिस्थितीच्या वर्मावर बोट ठेऊन १० जून रोजीच्या विशेष सभेला न्यायालयात आव्हान देऊन तुर्तास तरी सभापतींनी ब्रेक लावले. उलटपक्षी न्यायालयाने २१ जुलै पर्यंत सभापती विरुद्धच्या प्रतिवादींसह सचिवांना नोटीस देऊन उत्तर सादर करण्याचे आदेश दिल्याचे सुत्रांकडून समजते. आर्थिकदृष्ट्या गांगावलेल्या स्थितीत कर्मचाऱ्यांचे वेतनासाठी म्हणा, धान्य खरेदी केलेल्या शेतकऱ्यांचे चुकारे देण्यासाठी मुद्दत ठेव मोडीत काढून की अन्य मार्गाने परंतु गोदामाला सिल ठोकले त्यावेळी सर्वांच्या साक्षीने सभापतींनी शेतकऱ्यांचा चुकारा केल्याचे पहायला मिळाले.

बाजार समिती स्वायत्त असलीतरी तिच्यावर सहकार विभागाचे नियंत्रण असते. बँकेतील मुदत ठेव, मुदतपूर्व मोडण्यासाठी जिल्हा उपनिबंधक किंवा संबंधित सक्षम प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घ्यावी लागते. बाजार समितीच्या अधिकृत लेटरहेडवर ठेव मोडण्याबाबतचा बँक व्यवस्थापकांच्या नावे अर्ज, संचालक मंडळाच्या सभेत संमत झालेल्या ठरावाची साक्षांकित प्रत, मूळ ठेव पावती, बँकेने दिलेली मूळ एफडी पावती. या पावतीच्या पाठीमागे बाजार समितीच्या सभापती, उपसभापती आणि सचिवाची सही आणि शिक्का असणे आवश्यक असू शकते. मुदत ठेव मोडीत काढण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे बँकेत जमा केल्यानंतर बँक खातरजमा करु शकेल. शिवाय मुदतपूर्व ठेव मोडल्यास बँक नियमानुसार काही टक्के व्याज कपात करते, याची नोंद समितीने ठेवणे गरजेचे आहे. ठेव मोडल्यानंतर ती रक्कम थेट बाजार समितीच्या अधिकृत चालू किंवा बचत खात्यात जमा केली जाते असे सांगितले जाते. या उलथापालथीत त्या संचालकांचा तीळमात्र संबंध नसेल तर सभापती आणि सचिव हे दोघेच मुदत ठेव मोडीत कसे काढू शकतात हे न उलगडणारे कोडे आहे. किमान बँक तरी सर्व बाबींची सर्वांच्या स्वाक्षऱ्यांची पडताळणी आणि खातरजमा करूनच कोणाच्या हातात नाही तर बाजार समितीच्या खात्यात रक्कम जमा करण्याचे प्रावधान असतांना सभापतींवर भ्रष्टाचाराचे आरोप कसे केले जाऊ शकतात याबद्दल तर्कवितर्कांचे पेव फुटले आहेत. अविश्वास प्रस्ताव हा जिल्हाधिकाऱ्यांकडे दाखल करण्याऐवजी जिल्हा उपनिबंधकांकडेच का केला? हा यक्ष प्रश्न वाटतोय. न्यायालयाने विविध निकालांवरुन निरीक्षणं नोंदवत आदेशही फर्मावले आहेत. जमीन विक्री करण्यापूर्वी संबंधित वरिष्ठांची परवानगीसाठी दाखल केलेल्या पत्रात गोंडस पान ४ वर

## शेतकऱ्याला नवा बैल देण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

लातूर:देवणी तालुक्यातील बोंबळी येथील शेतकरी काशिनाथ गायकवाड यांना मदतीसाठी प्रशासनाकडून देण्यात आलेला बैल आजारी असल्याचे समोर आल्यानंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणावर पत्रकार परिषदेत प्रश्न उपस्थित होताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ हस्तक्षेप करत संबंधित शेतकऱ्याला सक्षम व निरोगी बैल उपलब्ध करून देण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

काही दिवसांपूर्वी वादळी पावसादरम्यान वीज कोसळून काशिनाथ गायकवाड यांचा एकमेव बैल मृत्युमुखी पडला होता. ऐन पेरणीच्या तोंडावर शेतीचे काम ठप्प झाल्याने त्यांच्या पत्नीने स्वतः खांद्यावर जू घेऊन नांगरणी सुरू केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या हृदयद्रावक घटनेची दखल घेत प्रशासनाने तातडीने मदत म्हणून स्थानिक गोशाळेतून एक बैल उपलब्ध करून दिला होता.मात्र, मदतीसाठी देण्यात आलेला हा बैल दोनच दिवसांत शेतातील मशागतीदरम्यान खाली बसला. पशुवैद्यकीय तपासणीत तो आजारी असल्याचे निष्पन्न झाल्याने मदतीचा गाजावाजा करणाऱ्या प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संकटग्रस्त शेतकऱ्याला दिलासा देण्याऐवजी त्याच्यावर उपचाराचा अतिरिक्त खर्च लादल्याची टीका होत आहे.या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, लातूरमधील घटना मन हेलावून टाकणारी होती. बैलाचा मृत्यू झाल्यानंतर शेतकऱ्याच्या पत्नीला औताला पान ४ वर



## व्हयरं भाऊ! नेहरु असते तर...

**दृष्टीक्षेप**
**प्रदीप नागापूरकर**

व्हयरं भाऊ! देशात सध्या एक नवा विक्रम साजरा करण्याची लगबग सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकिर्दीतील एका विशिष्ट टप्प्याला मोठा ऐतिहासिक क्षण म्हणून रंगवले जात आहे. सोशल मीडियावर अभिनंदनाचे फटाके फुटत आहेत, तर काही भक्तमंडळींनी तर इतिहासाच्या वहीत नवीन प्रकरण लिहून टाकले आहे. पण या सगळ्या जल्लोषात एक प्रश्न सामान्य माणसाच्या मनात डोकावतोय. पंडित जवाहरलाल नेहरू यांनीही असा एखादा टप्पा गाठला होता, तेव्हा त्यांनी एवढे इव्हेंट केले होते का?

स्वातंत्र्यानंतरचा भारत म्हणजे आजच्या भारतासारखा नव्हता. ना सोशल मीडिया होता, ना ड्रोन कॅमेरे, ना ऐतिहासिक शब्दाचा रोजच्या वापराचा परवाना. नेहरूंनी एखादा विक्रम केला असता तर कदाचित त्यांनी पत्रकार परिषद घेतली असती का?, एखादे धरण उद्घाटन केले असते किंवा वैज्ञानिक संस्थेची पायाभरणी केली असती. आजच्या काळात असते तर कदाचित ''मन की बात'' ऐवजी ''मनात काय चाललंय?'' असा कार्यक्रम काढला असता. आता दुसरीकडे देश सुरक्षित हातात असल्याचा दावा होत असताना निवडणुकीच्या सभांमध्ये ''हिंदू खतरे में है'' अशी घोषणाही ऐकू येते. मग सामान्य माणूस गोंधळतो. जर सगळं सुरक्षित असेल तर धोका नक्की कुणाकडून आणि कुणाला? की हा धोका फक्त निवडणुकीच्या हंगामातच बाहेर पडतो?

देशाची प्रगती वेगाने होत असल्याचे सांगितले जाते. पण मग नीरव मोदी, विजय मल्ल्या यांसारखे उद्योगपती हजारो कोटींची कर्जे घेऊन परदेशात कसे गेले? विमानतळावर सुरक्षा तपासणी करणाऱ्यांनी त्यांना ''देशाच्या विकासासाठी परदेश दौरा'' समजून हात हलवला होता का?, असा प्रश्न पडतो. नीटसारख्या परीक्षांचे पेपर फुटतात. विद्यार्थ्यांचे वर्षभराचे कष्ट पाण्यात जातात. चौकशी समित्या बसतात, काही जणांना ताब्यात घेतले जाते, काही अधिकाऱ्यांच्या बदल्या होतात आणि मग बातम्यांचे चक्र पुढे सरकते. विद्यार्थी मात्र तिथेच उभा राहतो. अशावेळी प्रश्न पडतो, नेहरू असते तर काय केले असते?

कदाचित त्यांनी प्रथम जबाबदारी निश्चित केली असती. कदाचित संसदेत चर्चा केली असती. कदाचित चुका मान्य करण्याची राजकीय संस्कृती जपली असती. किंवा कदाचित त्यांनीही एखादी समिती नेमली असती. पण एक गोष्ट नक्की, त्या काळात ट्रोल आर्मी नसल्यामुळे प्रश्न विचारणाऱ्याला देशद्रोही ठरवण्याची सोय नव्हती.

व्हयरं भाऊ! इतिहासातील नेत्यांची तुलना करणे सोपे असते, पण त्यांच्या काळातील आव्हाने समजून घेणे कठीण असते. त्यामुळे विक्रमांचा जल्लोष करा, पण प्रश्न विचारण्याचा अधिकारही जपून ठेवा. कारण लोकशाहीत टाळ्या आणि प्रश्न दोन्ही महत्त्वाचे असतात; फक्त टाळ्या वाजत राहिल्या तर एक दिवस प्रश्नच उरायचे नाहीत!

# प्रश्नांसाठीही एवढ्याच ताकदीची गरज

**महाराष्ट्रात सध्या विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील १७ जागांसाठी निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. या निवडणुकांमुळे राज्यातील राजकीय समीकरणे, पक्षांतर्गत संघर्ष, जागा वाटपातील तणाव आणि सत्तेच्या राजकारणातील अनेक पैलू पुन्हा एकदा समोर आले आहेत. निवडणूक म्हटली की; राजकीय पक्ष आपली संपूर्ण ताकद पणाला लावतात, हे नवीन नाही. मात्र हीच ताकद आणि ऊर्जा सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी कितपत वापरली जाते?, हा प्रश्न या निवडणुकांच्या निमित्ताने पुन्हा ऐरणीवर आला आहे. विधान परिषदेच्या या निवडणुकांमध्ये महायुतीकडे विजयासाठी आवश्यक ते संख्याबळ उपलब्ध आहे. त्यामुळे बहुतांश ठिकाणी निकालांची दिशा आधीच स्पष्ट झालेली दिसते. विरोधकांकडे सत्ताधारी पक्षांच्या मतांमध्ये फूट पाडण्याची किंवा समीकरणे बदलण्याची ताकद नसल्याने ही निवडणूक बहुतांशी एकतर्फी होणार असल्याचे चित्र आहे. तरीही जागा वाटपाच्या प्रक्रियेत महायुतीतील घटक पक्षांमध्ये झालेली रस्सीखेच विशेष लक्षवेधी ठरली.कोकणातील जागेवर शिवसेनेचे संख्याबळ अधिक असतानाही राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या पुत्रासाठी एकनाथ शिंदे गटाने माघार घेतली. या निर्णयामागे राजकीय समन्वय आणि भविष्यातील सत्तासमीकरणांचे गणित असल्याची चर्चा रंगली. त्याबदल्यात रायगडच्या पालकमंत्रीपदाबाबत काही राजकीय तडजोड झाली असल्याच्या शक्यताही व्यक्त केल्या जात आहेत. तटकरे यांचे पुत्र बिनविरोध निवडून आले असले तरी रायगडच्या पालकमंत्रीपदाचा वाद अद्याप कायम आहे. यावरून निवडणुकी पलीकडील सत्तेचे राजकारण किती गुंतागुंतीचे असते, याची कल्पना येते.नाशिकच्या जागेवरील घडामोडींनी तर अधिकच खळबळ उडवली. ही जागा शिवसेना (शिंदे गट) यांच्या वाट्याला गेली असतानाच भाजपच्या उमेदवाराने बंडखोरीचा मार्ग स्वीकारला. या बंडखोरीला आळा घालण्यासाठी राज्यातील काही मंत्र्यांनी दोन दिवस नाशिकमध्ये तळ ठोकला. पक्षांतर्गत मतभेद मिटविण्यासाठी आणि निवडणुकीतील विजय सुनिश्चित करण्यासाठी सत्ताधारी पक्षांनी दाखविलेली तत्परता उल्लेखनीय म्हणावी लागेल. निवडणुकीतील प्रत्येक मत आणि प्रत्येक जागा महत्त्वाची मानून पक्षांनी केलेले प्रयत्न पाहता त्यांच्या संघटनशक्तीची कल्पना येते.मात्र याच ठिकाणी एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतो. निवडणूक जिंकण्यासाठी जी राजकीय इच्छाशक्ती, संघटनात्मक ताकद आणि प्रशासनिक समन्वय वापरला जातो, तोच सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी का दिसून येत नाही? शेतकऱ्यांच्या अडचणी, बेरोजगारी, पिण्याच्या पाण्याची समस्या, खराब रस्ते, आरोग्य सेवेतील कमतरता, शिक्षण क्षेत्रातील प्रश्न आणि वाढती महागाई यांसारख्या मुद्द्यांवर अनेकदा नागरिकांना वर्षानुवर्षे संघर्ष करावा लागतो. एखाद्या निवडणुकीसाठी नेते, मंत्री आणि कार्यकर्ते रात्रंदिवस मेहनत घेताना दिसतात; परंतु नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांच्या बाबतीत अशीच धावपळ क्वचितच दिसून येते.लोकशाहीत निवडणुका अत्यंत महत्त्वाच्या असतात. त्या सत्तेचा मार्ग निश्चित करतात. परंतु निवडणुका हे साधन आहे, अंतिम उद्दिष्ट नव्हे. अंतिम उद्दिष्ट म्हणजे जनतेचे कल्याण आणि विकास. निवडणुकीच्या काळात राजकीय पक्षांमध्ये दिसणारी एकजूट, समन्वय आणि कार्यक्षमता जर विकासकामांसाठी वापरली गेली, तर अनेक प्रश्न मार्गी लागू शकतात. नागरिकांना आश्वासने नव्हे, तर परिणाम अपेक्षित आहेत.आज महाराष्ट्रातील राजकारणात निवडणूक व्यवस्थापनाला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र निवडणूक जिंकण्याइतकेच महत्त्व जनतेचा विश्वास जिंकण्यालाही आहे. तो विश्वास केवळ राजकीय डावपेचांनी मिळत नाही; तर जनहिताच्या प्रश्नांवर संवेदनशील आणि परिणामकारक कामगिरीतून मिळतो. त्यामुळे विधान परिषद निवडणुकांच्या निमित्ताने राजकीय पक्षांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. निवडणुकांसाठी जशी सर्व शक्ती एकवटली जाते, तशीच शक्ती आणि बांधिलकी सर्वसामान्यांच्या प्रश्नांच्या समाधानासाठीही दाखविली गेली, तर लोकशाही अधिक सक्षम होईल आणि जनतेलाही खऱ्या अर्थाने दिलासा मिळेल.**

# बालपणाला मुक्त श्वास देऊया

**डॉ.राजेंद्र बगाटे**



दि.१२ जून हा दिवस जगभरात 'बालमजुरी विरोधी जागतिक दिन' म्हणून साजरा केला जातो. बालपण हे प्रत्येक मुलाच्या आयुष्यातील सर्वात निरागस, आनंददायी आणि घडणारा काळ असतो. या काळात मुलांच्या हातात पुस्तके, खेळणी आणि स्वप्नांची रंगीत दुनिया असायला हवी; परंतु वास्तव मात्र यापेक्षा खूप वेगळे आहे. जगातील कोट्यवधी मुले आजही गरिबी, सामाजिक विषमता, अशिक्षितपणा आणि विविध प्रतिकूल परिस्थितींमुळे शिक्षणापासून वंचित राहून मजुरी करण्यास भाग पडत आहेत. त्यांच्या कोवळ्या हातात पेनऐवजी विटा, कचऱ्याच्या पिशव्या, चहाचे ग्लास किंवा कारखान्यातील धोकादायक साधने दिली जात आहेत. ही परिस्थिती केवळ त्या मुलांच्या भविष्यावरच परिणाम करणारी नाही, तर संपूर्ण समाजाच्या विकासालाही अडथळा निर्माण करणारी आहे. म्हणूनच बालमजुरीविरोधी जागतिक दिनाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते.

बालमजुरी ही केवळ आर्थिक समस्या नसून ती सामाजिक, नैतिक, शैक्षणिक आणि मानवी हक्कांशी संबंधित गंभीर समस्या आहे. जेव्हा एखाद्या मुलाला त्याच्या वयानुसार शिक्षण, खेळ, आरोग्य आणि सुरक्षित वातावरणापासून वंचित ठेवून उपजीविकेसाठी काम करण्यास भाग पाडले जाते, तेव्हा ती बालमजुरी ठरते. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या व्याख्येनुसार अशी कोणतीही कामे जी मुलांच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक किंवा नैतिक विकासासाठी घातक ठरतात आणि त्यांच्या शिक्षणात अडथळा निर्माण करतात, ती बालमजुरी मानली जातात. बालमजुरीमुळे मुलांचे बालपण हिरावले जाते, त्यांचे शिक्षण अर्धवट राहते आणि त्यांचे आयुष्य गरिबीच्या दुष्टचक्रात अडकून पडते. बालमजुरीचा इतिहास मानवजातीच्या औद्योगिक विकासाशी निगडित आहे. औद्योगिक क्रांतीच्या काळात कारखान्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर बालकामगारांचा वापर केला जात असे. कमी वेतनात, जास्त वेळ आणि कोणतीही सुरक्षा नसताना मुलांकडून काम करून घेतले जात असे. कालांतराने समाजसुधारक, मानवाधिकार संघटना आणि विविध देशांच्या सरकारांनी बालमजुरीविरोधात आवाज उठवला. कामाच्या ठिकाणी मुलांचे होणारे शोषण रोखण्यासाठी विविध कायदे करण्यात आले. या चळवळीचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे २००२ साली आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने १२ जून हा दिवस 'बालमजुरीविरोधी जागतिक दिन' म्हणून घोषित केला. या दिवसाचे उद्दिष्ट बालमजुरीविषयी जनजागृती करणे, बालकामगारांच्या समस्यांकडे जगाचे लक्ष वेधणे आणि बालमजुरी निर्मूलनासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्यास प्रोत्साहन देणे हे आहे. जगभरातील बालमजुरीचे स्वरूप विविध प्रकारचे आहे. काही मुले शेतीच्या कामात गुंतलेली असतात, तर काही कारखाने, हॉटेल्स, चहाच्या टपऱ्या, बांधकाम क्षेत्र, खाणी, घरगुती कामे, कचरा वेचणे किंवा रस्त्यावरील विक्री यांसारख्या क्षेत्रांत काम करतात. काही ठिकाणी मुलांना सक्तीची मजुरी करावी लागते, तर काही मुलांना मानवी तस्करीद्वारे कामासाठी विकले जाते. विशेषतः धोकादायक उद्योगांमध्ये काम करणाऱ्या मुलांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. रसायनांचा संपर्क, धूळ, आवाज, अवजड यंत्रसामग्री आणि अपुरी सुरक्षा यामुळे त्यांना विविध आजारांना सामोरे जावे लागते. अनेकदा अपघातांमुळे त्यांचे कायमस्वरूपी अपंगत्वही येते.

बालमजुरीची कारणे अनेकांगी आहेत. गरिबी हे त्यामधील प्रमुख कारण मानले जाते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांमध्ये मुलांच्या कमाईला कुटुंबाच्या उत्पन्नाचा एक भाग म्हणून पाहिले जाते. शिक्षणाचा खर्च, बेरोजगारी, कर्जबाजारीपणा आणि अपुरी सामाजिक सुरक्षा यामुळे पालक मुलांना कामावर पाठवतात. अशिक्षित पालकांना शिक्षणाचे महत्त्व समजत नाही आणि तात्पुरत्या आर्थिक गरजांपुढे मुलांच्या भवितव्याकडे दुर्लक्ष होते. काही भागांत सामाजिक रूढी, लिंगभेद आणि पारंपरिक व्यवसायांची सक्ती यांमुळेही बालमजुरी वाढीस लागते. मुलींना घरगुती कामे किंवा घरकामासाठी इतरांकडे पाठविण्याच्या घटनाही मोठ्या प्रमाणात आढळून येतात. शिक्षणाचा अभाव आणि बालमजुरी यांचे घनिष्ठ नाते आहे. जी मुले शाळेबाहेर राहतात, त्यांना बालमजुरीच्या विळख्यात अडकण्याची शक्यता अधिक असते. दुसरीकडे, जेव्हा मुले काम करू लागतात, तेव्हा त्यांचे शिक्षण खंडित होते. अशा प्रकारे गरिबी, अशिक्षण आणि बालमजुरी यांचे दुष्टचक्र तयार होते. या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी सर्वसमावेशक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण अत्यंत आवश्यक आहे. शाळांमध्ये आकर्षक वातावरण, मोफत शैक्षणिक सुविधा, पौष्टिक आहार योजना आणि पालकांमध्ये जागृती निर्माण केल्यास बालमजुरीचे प्रमाण कमी होऊ शकते. भारतात बालमजुरी ही चिंतेची बाब राहिली आहे. देशाने आर्थिक प्रगती केली असली, तरी अनेक सामाजिक आणि आर्थिक विषमतांमुळे बालमजुरी पूर्णतः नष्ट झालेली नाही. ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांमध्ये बालकामगार आढळून येतात. काही मुले शेतीत काम करतात, तर काही लहान उद्योग, हॉटेल्स, वर्कशॉप्स, विटभट्ट्या आणि घरगुती उद्योगांमध्ये गुंतलेली असतात. शहरांमध्ये स्थलांतरित कुटुंबांतील मुलांवर बालमजुरीचे संकट अधिक तीव्रतेने दिसून येते. कोविड-१९ महामारीनंतर अनेक कुटुंबांच्या आर्थिक स्थितीवर विपरीत परिणाम झाल्याने काही भागांत बालमजुरीचे प्रमाण वाढल्याची भीती व्यक्त करण्यात आली होती. भारतीय राज्यघटनेने बालकांच्या संरक्षणासाठी विविध तरतुदी केल्या आहेत. राज्यघटनेच्या कलम २४ नुसार चौदा वर्षांखालील मुलांना कारखाने, खाणी किंवा इतर धोकादायक उद्योगांमध्ये कामावर ठेवण्यास बंदी घालण्यात आली आहे. कलम २१-अ नुसार सहा ते चौदा वर्षे वयोगटातील मुलांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार देण्यात आला आहे. राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांमधील कलम ३९ मध्ये मुलांच्या आरोग्याचे आणि विकासाचे संरक्षण करण्यावर भर देण्यात आला आहे. या घटनात्मक तरतुदी बालहक्कांच्या संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण ठरतात. भारतात बालमजुरी प्रतिबंधासाठी विविध कायदे अस्तित्वात आहेत. बालमजुरी (प्रतिबंध आणि नियमन) अधिनियम १९८६ आणि त्यामधील २०१६ मधील सुधारणा महत्त्वपूर्ण आहेत. या कायद्यानुसार चौदा वर्षांखालील मुलांना कोणत्याही व्यवसायात रोजगार देण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच चौदा ते अठरा वर्षे वयोगटातील किशोरांना धोकादायक उद्योगांमध्ये काम करण्यास मनाई करण्यात आली आहे. शिक्षणाचा हक्क कायदा, किशोर न्याय कायदा आणि मानवी तस्करीविरोधी तरतुदी देखील बालमजुरीविरोधातील लढ्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. तथापि, केवळ कायदे पुरेसे नसून त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. बालमजुरीचा मुलांच्या शारीरिक आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. वाढत्या वयात अति श्रम केल्यामुळे त्यांच्या शरीराची योग्य वाढ होत नाही. कुपोषण, अशक्तपणा, श्वसनविकार, त्वचारोग आणि दृष्टीदोष यांसारख्या समस्या उद्भवतात. धोकादायक उद्योगांमध्ये काम करणाऱ्या मुलांना रसायनांच्या संपर्कामुळे दीर्घकालीन आजार होऊ शकतात. अपुऱ्या विश्रांतीमुळे आणि अस्वच्छ वातावरणामुळे त्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते.

बालमजुरीचे मानसिक परिणामही तितकेच गंभीर असतात. बालपणात सतत कामाचा ताण, मारहाण, अपमान आणि शोषण यांचा सामना करणाऱ्या मुलांमध्ये नैराश्य, भीती, आत्मविश्वासाचा अभाव आणि सामाजिक अलिप्तता निर्माण होऊ शकते. काही मुलांना भावनिक आधार मिळत नसल्याने त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास खुंटतो. बालमजुरीमुळे त्यांच्यातील सर्जनशीलता, जिज्ञासा आणि स्वप्न पाहण्याची क्षमता कमी होत जाते. बालमजुरी ही मुलांच्या मूलभूत मानवी हक्कांचे उल्लंघन आहे. प्रत्येक मुलाला शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता, संरक्षण आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. बालहक्कांसंदर्भातील संयुक्त राष्ट्रसंघाच्या करारामध्ये मुलांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात आला आहे. बालमजुरी या हक्कांना बाधा आणते आणि मुलांना त्यांच्या क्षमतांचा पूर्ण विकास करण्यापासून रोखते. त्यामुळे बालमजुरीविरोधातील लढा हा मानवी प्रतिष्ठेच्या संरक्षणासाठी आवश्यक आहे. बालमजुरी निर्मूलनासाठी सरकार, स्वयंसेवी संस्था, उद्योगक्षेत्र, शैक्षणिक संस्था आणि सामान्य नागरिक यांचे संयुक्त प्रयत्न आवश्यक आहेत. सरकारने गरिबी निर्मूलनाच्या योजना प्रभावीपणे राबविणे, गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे आणि कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. स्वयंसेवी संस्था बालकामगारांची ओळख पटविणे, त्यांचे पुनर्वसन करणे आणि समाजामध्ये जागृती निर्माण करणे यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. उद्योगक्षेत्राने पुरवठा साखळीमध्ये बालकामगारांचा वापर होणार नाही याची खात्री करणे आवश्यक आहे.

पालकांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य देणे, अल्पकालीन आर्थिक फायद्यापेक्षा त्यांच्या उज्ज्वल भविष्याचा विचार करणे आणि मुलांवरील कामाचा बोजा कमी करणे आवश्यक आहे. समाजानेही बालकामगारांकडे केवळ सहानुभूतीने न पाहता त्यांच्या समस्येच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न करायला हवा. घरगुती मदतनीस म्हणून किंवा लहान उद्योगांमध्ये बालकामगारांचा वापर टाळणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. माध्यमांची भूमिकाही महत्त्वपूर्ण ठरते. वृत्तपत्रे, दूरदर्शन, रेडिओ आणि सामाजिक माध्यमांच्या साहाय्याने बालमजुरीच्या समस्येकडे समाजाचे लक्ष वेधले जाऊ शकते. बालकामगारांच्या वास्तवाचे चित्रण करून जनजागृती केली जाऊ शकते. तसेच यशस्वी पुनर्वसनाच्या कथा समाजासमोर आणल्यास सकारात्मक बदल घडवून आणण्यास मदत होऊ शकते. शिक्षण हा बालमजुरीविरोधातील सर्वात प्रभावी उपाय मानला जातो. प्रत्येक मुलाला दर्जेदार, सर्वसमावेशक आणि आनंददायी शिक्षण मिळाल्यास बालमजुरीचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटू शकते. शाळा सोडलेल्या मुलांना पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष उपक्रम राबविणे आवश्यक आहे. कौशल्य विकास, समुपदेशन आणि आर्थिक सहाय्याच्या माध्यमातून बालकामगारांचे पुनर्वसन केले जाऊ शकते. बालमजुरीविरोधी जागतिक दिन आपल्याला केवळ समस्या दाखवून देत नाही, तर उपाययोजनांची दिशाही दाखवतो. या दिवसानिमित्त आयोजित केले जाणारे जनजागृती कार्यक्रम, चर्चासत्रे, शालेय उपक्रम आणि मोहिमा समाजामध्ये सकारात्मक बदल घडविण्यास मदत करतात. मुलांचे बालपण सुरक्षित ठेवण्यासाठी सामूहिक बांधिलकी निर्माण करणे हे या दिवसाचे खरे उद्दिष्ट आहे.

आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात मानवाने अभूतपूर्व प्रगती केली आहे; परंतु जर समाजातील एकही मूल शिक्षणापासून वंचित राहून मजुरी करण्यास भाग पडत असेल, तर आपल्या विकासाच्या संकल्पना अपूर्ण ठरतात. मुलांच्या हातात कामाची साधने नव्हे तर ज्ञानाची साधने असली पाहिजेत. त्यांना भयमुक्त, शोषणमुक्त आणि आनंदी बालपण मिळणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. बालमजुरी निर्मूलन हा केवळ सरकारचा कार्यक्रम नसून तो सामाजिक चळवळ बनला पाहिजे. प्रत्येकाने आपल्या स्तरावर जागरूक राहून बालमजुरीच्या घटनांची माहिती संबंधित यंत्रणांना द्यावी. बालकामगारांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सहकार्य करावे. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन बालपणाचे संरक्षण करण्यासाठी पुढाकार घेतल्यासच बालमजुरीमुक्त समाजाची निर्मिती शक्य होईल. दि. १२ जूनचा हा दिवस आपल्याला एक महत्त्वपूर्ण संदेश देतो की मुलांचे स्थान शाळेत आहे, कामाच्या ठिकाणी नाही. त्यांच्या चेहऱ्यावरचे हसू, डोळ्यांतील स्वप्ने आणि भविष्याबद्दलची आशा जपणे हीच खरी मानवता आहे. प्रत्येक मूल हे राष्ट्राची अमूल्य संपत्ती आहे. त्यांना सुरक्षित, सन्मानपूर्वक आणि संधींनी समृद्ध जीवन देणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. बालमजुरीविरोधातील संघर्ष हा मुलांच्या अधिकारांसाठी, सामाजिक न्यायासाठी आणि अधिक संवेदनशील जगाच्या निर्मितीसाठीचा संघर्ष आहे.चला,या जागतिक दिनानिमित्त आपण सर्वजण अशी प्रतिज्ञा करूया की कोणत्याही मुलाचे बालपण मजुरीच्या ओझ्याखाली दबले जाणार नाही. प्रत्येक मुलाला शिक्षण, संरक्षण, प्रेम आणि स्वप्न पाहण्याचे स्वातंत्र्य मिळेल. कारण बालपण वाचविणे म्हणजेच भविष्य वाचविणे होय.


**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक-०४/०६/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री.संजय बापुराव केंद्रे रा.फकिरदरावाडी ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.विशाल संजय केंद्रे रा.फकिरदरावाडी ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव विशाल संजय केंद्रे रा.फकिरदरावाडी ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०७/०६/२००८ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करीता सदर तहसिल कार्यालय कंधार येथे दिनांक २९/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- ०४/०६/२०२६
स्थळ - कंधार

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार



**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक-०५/०६/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार शेख रेश्मा हबीब रा.गऊळ ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा शेख रेश्मा हबीब रा.गऊळ ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव शेख रेश्मा हबीब रा.गऊळ ता.कंधार या ठिकाणी दिनांक ११/०३/२००० या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करीता सदर तहसिल कार्यालय कंधार येथे दिनांक ०२/०६/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- ०५/०६/२०२६
स्थळ - कंधार

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार


# आपले सरकार सेवा केंद्रांमधून आता ५०० हून अधिक शासकीय सेवा उपलब्ध

नांदेड/प्रतिनिधी-ग्रामीण भागातील नागरिकांना विविध शासकीय सेवा व प्रमाणपत्रे गावपातळीवरच उपलब्ध व्हावीत, यासाठी ग्रामपंचायतींमधील आपले सरकार सेवा केंद्रे अद्ययावत करून पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याचे निर्देश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी दिले आहेत.पूर्वी या केंद्रांमध्ये मर्यादित स्वरूपातील सेवा उपलब्ध होत्या. मात्र आता महा ऑनलाईनचे सर्व अधिकार ग्रामपंचायत स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्रांना प्राप्त झाले असून महसूल विभागासह विविध विभागांच्या ५०० हून अधिक शासकीय सेवा गावपातळीवर उपलब्ध होणार आहेत.या सेवांमध्ये उत्पन्न, रहिवासी, जात, नॉन-क्रिमिलेयर, अल्पभूधारक, राष्ट्रीयत्व, जन्म, मृत्यू, विवाह प्रमाणपत्र, नमुना-८ उतारा आदी विविध दाखले व प्रमाणपत्रांचा समावेश आहे.


सायंदैनिक नांदेड वार्ता

* संपर्क कार्यालय *

व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# रिठातांडा-रिठागावातील धोकादायक वीज यंत्रणेविरोधात ग्राहकांचा संताप;अधीक्षक अभियंत्यांना निवेदन



किनवट/प्रतिनिधी- रिठातांडा आणि रिठागावातील वीज पुरवठ्याकडे इस्लापूर महावितरण प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने वीज ग्राहकांना त्याचा फटका सहन करावा लागत आहे. वाकलेले विद्यूत पोल, लोंबकाळलेल्या विद्यूत वाहक तारा आणि तुटका-फुटका उघडा धोकादायक गावठाण डी.पी.ला वैतागून वीज ग्राहकांच्या शिष्टमंडळाने नांदेडच्या अधीक्षक अभियंत्यांची भेट घेऊन निवेदन सोपवले.

परवाच्या वादळीवाऱ्यासह झालेल्या अतिवृष्टीजन्य पावसामुळे रिठातांडा आणि रिठागावातील मुख्य चौकासह रस्त्यावरील विद्यूतपोल वाकले आहेत. त्यामुळे विद्यूतवाहक तारा लोंबकळल्या असून धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही. एखादी दुर्घटना होऊन नुकसान होण्यापूर्वी महावितरण प्रशासनाने तात्काळ कामे करावीत. रिठातांडा आणि रिठागावाला वीज पुरवठा करणाऱ्या गावठाण डी.पी.च्या बॉक्सची देखील दयनीय अवस्था झालीय. या संबंधी इस्लापूर वीज महावितरण अधिकाऱ्यांकडे समस्या मांडल्या परंतु त्यांच्याकडून उचित प्रतिसाद न मिळाल्याने जिल्हा प्रशासनाकडे धाव घ्यावी लागल्याचे इश्वर जाधवांची सांगितले. डी.पी.टी. सी.तून नव्याने मंजूर करण्यात आलेले काही पोल देखील बसवण्यात आले नाही. या दिरंगाईमुळे वीज ग्राहकांना त्याचा त्रास सोसावा लागतोय. जुनाट पोल, जुनाट विद्यूत वाहक तारा बदलून नवीन उभा करण्याची गरज आहे हे अधीक्षक अभियंता एस.एस. खंदारे निवेदनाद्वारे सरपंच संदिप पानपते, सामाजिक कार्यकर्ते ईश्वर जाधव, शिलवंत कांबळेंनी अवगत करून दिल्यानंतर खंदारे यांनी शिष्टमंडळाला सुधारणा करण्याची हमी दिलीय.

---

दि.१०.०६.२०२६

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व सबंधीतास जाहीर प्रगटन देण्यात येते की, मा. उप-अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय नांदेड या कार्यालयात श्रीमती पार्वतीबाई शंकरराव शास्त्री, रा.महानगर पालिका घर क्र.१-२४-७२६ विष्णुनगर नांदेड यांनी त्यांच्या नावावर नमुद असलेल्या वरील मालमत्तेच्या आखीव पत्रीकेमध्ये एकत्र कुटुंबकर्ता म्हणुन झालेली नोंद कमी करण्याकरीता प्रस्ताव दाखल केलेला आहे. नगर भूमापन क्रमांक ११०७० हा आहे.

सदरील मालमत्तेच्या त्या एकट्याच मालक व ताबेदार आहेत त्यामुळे सदर मालमत्तेत इतर कोणीही वारस नाही. याबाबत कुणास काही आक्षेप व उजर असल्यास या कार्यालयात सात दिवसाच्या आत संपर्क साधावा. त्यानंतर योग्य ती कार्यवाही केली जाईल.

जाहीर प्रगटन देणार
स्वाक्षरित/-
**मा.उप-अधिक्षक**
भुमि अभिलेख कार्यालय नांदेड

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**
Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक-०५/०६/२०२६
**(जन्म मृत्यू शाखा)**

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री.शेख शादुल हबीब रा.गऊळ ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.शेख शादुल हबीब रा.गऊळ ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव शेख शादुल हबीब रा.गऊळ ता.कंधार या ठिकाणी दिनांक १५/११/२००१ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करीता सदर तहसिल कार्यालय कंधार येथे दिनांक ०१/०६/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- ०५/०६/२०२६
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

---

## जाहीर प्रगटन

दिवाणी न्यायालय क.स्तर लोहा ता.लोहा जि.नांदेड
मा.श्रीमती पी.व्ही.चिद्रे यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.९२/२०२६
केशराबाई केंद्रे वगैरे - विरुद्ध निरंक

अर्जदार :- १) केशराबाई शामराव बेटकर वय ७० वर्षे, धंदा घरकाम रा.वाळकी बु.ता.लोहा जि.नांदेड, २) नागोराव शाम बेटकर वय ४६ वर्षे, धंदा शेती रा.विष्णूपुरी ता.जि.नांदेड, ३) शिवानंद पि. शामराव बेटकर (मयत), ३/१) पांडुरंग शिवानंद बेटकर वय २० वर्षे, धंदा-शिक्षण, ४) रामकिशन शामराव बेटकर वय ४७ वर्षे, धंदा मजुरी, ५) संतोष शामराव बेटकर वय ४० वर्षे, धंदा खाजगी नौकरी सर्व रा.वाळकी (बु.) ता.लोहा जि.नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार:- निरंक

प्रकरण:- कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट अन्वये मयत शामराव रानबा बेटकर यांचे अर्जदार हे वारस असल्याचे घोषीत करुन वारसा प्रमाणपत्र देणे बाबत.

याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.के.डी.गायकवाड यांच्या मार्फत अर्ज केला आहे.

हे की, मयत नामे शामराव रानबा बेटकर हे दिनांक ३१.८.२०२३ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार क्र.१ ही पत्नी, अर्जदार क्र.२ हा मुलगा, अर्जदार क्र.३/१ हा नातु व अर्जदार क्र.४ व ५ हे मयताचे मुले आहेत. मयतास अर्जदारा शिवाय इतर कोणीही दुसरे कायदेशीर वारस नाहीत.

हे की, अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही वारस नाहीत. तसेच अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारसाहक्क प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार हे मयताचे वारस असल्याचे, वारसाहक्क प्रमाणपत्र (Legal Heirship Certificate) मिळणेसाठी अर्जदारांनी अर्ज केला आहे.

तरी अर्जदार यांना वारसाचे प्रमाणपत्र (Legal Heirship Certificate) देणे बाबत कोणाचा काही आक्षेप उजर किंवा हरकत असेल तर ते त्यांनी दिनांक २२/०६/२०२६ रोजी पर्यंत किंवा हे जाहीर प्रगटन प्रकाशीत झाल्यापासून ३० दिवसांच्या आत किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः किंवा वकीला मार्फत उपस्थित राहून लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा पुढील आदेश पारित करण्यात येईल.

दिनांक १०/०६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

''आदेशावरुन''
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर,लोहा

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**
Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक-०५/०६/२०२६
**(जन्म मृत्यू शाखा)**

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री.शिवाजी रामकिशन गुटे रा.फकिरदरावाडी ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.निवृत्ती शिवाजी गुटे रा.फकिरदरावाडी ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव निवृत्ती शिवाजी गुटे रा.फकिरदरावाडी ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०७/०६/२००९ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करीता सदर तहसिल कार्यालय कंधार येथे दिनांक ०३/०६/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- ०५/०६/२०२६
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**
Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक-०४/०६/२०२६
**(जन्म मृत्यू शाखा)**

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री.राजेश पुंडलिक सोनकांबळे रा.दिग्रस खु. ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.गीत राजेश पुं.सोनकांबळे रा.दिग्रस खु. ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव गीत राजेश सोनकांबळे रा.दिग्रस खु. ता.कंधार या ठिकाणी दिनांक ३०/०६/२०१४ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करीता सदर तहसिल कार्यालय कंधार येथे दिनांक २५/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- ०४/०६/२०२६
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

---

## जाहीर प्रगटन

मा.श्रीमती ए.टी.गित्ते, दिवाणी न्यायाधीश क.स्तर नायगांव
यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४९/२०२६
व्यंकटी शिंदे व इतर ०१ वि.निरंक

अर्जदार :- १. व्यंकटी पि.दत्ता शिंदे वय : ५६ वर्षे, धंदा मजुरी, २. मारोती पि.व्यंकटी शिंदे वय : १७ वर्षे, धंदा शिक्षण अ.पा.क.सख्खे वडील अर्जदार क्र.१ दोघे रा.मुस्तापुर पोस्ट लोहगांव ता.नायगांव खै.जि.नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार:- निरंक

दावा:- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या जाहीर प्रगटणाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मयत लक्ष्मीबाई भ्र.व्यंकटी शिंदे यांचे अर्जदार क्र.१ हे पती आहेत व अर्जदार क्र.२ मुलगा आहे. मयत लक्ष्मीबाई भ्र.व्यंकटी शिंदे यांचा मृत्यु दि.२१/०९/२०२५ रोजी मुस्तापुर ता.नायगांव जि.नांदेड येथे झाला आहे. अर्जदाराशिवाय मयतांचे कोणीही वारस नाहीत असे अर्जदारांनी अर्जात नमुद केले आहे. अर्जदार यांनी मयत लक्ष्मीबाई भ्र. व्यंकटी शिंदे यांचा वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटण द्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील संबधिताना मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत ३० दिवसाच्या आत दिनांक २२/६/२०२६ रोजी सकाळी ११ वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जवाबदारी आपणा वर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २३/०३/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
क.लिपिक
दि.न्या.,क.स्तर, नायगांव

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
स.अधिक्षक
दि.न्या.,क.स्तर, नायगांव

---

# खत विक्रेत्यांकडून प्रचंड लूट;२६६ चा युरीया ४०० रुपयाला,कृषी अधिकाऱ्यांचे अर्थपुर्ण दुर्लक्ष

मुखेड/प्रतिनिधी-येथील मोंढा मार्केट मध्ये सध्या बि-बियाणे खरेदीची प्रचंड झुंबड चालू असून व्यापाऱ्यांची चांदी चालू आहे. खते, बि-बियाणे अव्वाच्या सव्वा भावाने विकले जात असून शेतकऱ्यांना तोंड दाबून बुक्यांचा मार सहन करावा लागत आहे. कारण पेरणीचा मोसम जवळ आल्याने व्यापारी म्हणतील त्या भावाने बि-बियाणे, खते खरेदी करावे लागत आहे. युरिया खताचा भाव २६६ असताना ४०० ते ४५० रुपये व डीएपी खताचा भाव १३५० असताना १७०० ते १८०० रुपये भावाने दिले जात आहे. शेतकऱ्यांनी पावती मागीतल्यास दिली जात नाही, केवळ एका साध्या चिठ्ठीवर व्यवहार चालू आहे. शेतकऱ्यांची प्रचंड लूट चालू असताना येथील कृषि अधिकाऱ्यांचे मात्र अर्थपुर्ण दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे.

जून महिण्याच्या सुरुवातीलाच पावसाचे आगमन झाल्याने शेतकरी बि-बियाणे खरेदी करुन ठेवत आहेत. मुखेड येथील मोंढा मार्केटमध्ये सर्व कृषि व खताची दुकाने आहेत. गेल्या वर्षी झालेल्या जास्तीच्या पावसाने अनेकांचे बळी घेतले परंतू या वर्षी कमी पाऊस पडणार असल्याचे सांगीतले जात आहे. यामुळे शेतकरी बि-बियाणे खरेदीला सुरुवात केली आहे. युरीया खताचा दर २६६ रुपये असताना ४०० ते ४५० रुपयाला विकले जात आहे तर डिएपी खताचा भाव १३५० असताना १७०० ते १८०० रुपये दराने विक्री होत आहे. राशी कंपनीच्या कापूस बियाणाचे दर ८८० रुपये असताना १२०० ते १३०० रुपयाला घ्यावे लागत आहे. शेतकऱ्यांनी पावती मागीतल्यास दिली जात नाही तर एका पांढऱ्या कागदाच्या चिठ्ठीवर भागविल्या जात आहे. शेतकऱ्यांची एवढी लुट चालू असताना कृषी अधिकारी मात्र कुठेच दिसून येत नाहीत. कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी मा.राहुल कर्डिले साहेब यांनी यात लक्ष घालून जादा दराने विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यावर कार्यवाही करावी व शेतकऱ्यांना योग्य दरात खते, बि-बियाणे उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

---

## प्राणघातक हल्ल्यात २० वर्षीय युवकाचा मृत्यू

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील गोविंदनगर येथील शेजाऱ्याने जुन्या वादातून कटरने एकावर जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणात विमानतळ पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल झाला आहे. गोविंदनगर भागात राहणारे सत्यम शंकर जाधव (वय ५८) व गौतम पुंडलिक गजभारे (वय २०) यांच्यात जुने वाद होते. या वादातून सत्यम जाधव याने गौतमवर कटरने जीवघेणा हल्ला केला. जखमी गौतमला शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. पण उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

---

CHANGE IN NAME/SURNAME

My (old name) is **AGRAWAL RADHIKA** which now I am, changing as (new name) **RADHIKA GAURAV BHARTIYA**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**RADHIKA GAURAV BHARTIYA**
R/o 101 A, Sanman pride, near Borban area,
Borban Vazirabad Nanded-431601
M.No.-9405126304

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**
Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक-०५/०६/२०२६
**(जन्म मृत्यू शाखा)**

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री.मोहम्मद जुनेद मोहम्मद इफतेखार रा.दर्गापुरा कंधार ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.मोहम्मद हुमेद जुनेद रा.दर्गापुरा कंधार ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव मोहम्मद हुमेद जुनेद रा.दर्गापुरा कंधार ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०३/०५/२०२५ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करीता सदर तहसिल कार्यालय कंधार येथे दिनांक ०१/०६/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- ०५/०६/२०२६
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**
Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक-०४/०६/२०२६
**(जन्म मृत्यू शाखा)**

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री.रावसाहेब केरबा वाघमारे रा.शेकापुर ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.केरबा रावजी वाघमारे रा.शेकापुर ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव केरबा रावजी वाघमारे रा.शेकापुर ता.कंधार या ठिकाणी दिनांक २६/०५/१९९८ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करीता सदर तहसिल कार्यालय कंधार येथे दिनांक २२/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- ०४/०६/२०२६
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

---

## जाहीर प्रगटन

तहसिलदार उमरी तथा तालुका दंडाधिकारी उमरी यांचे न्यायालयात
इ.कि.फौ.अर्ज.क्र./२०२५
श्री/श्रीमती **शेख हबीब अहमद हुसेन**
विरुध्द

ग्राम पंचायत अधिकारी,ग्रामपंचायत कार्यालय **तळेगाव** ता.उमरी जि.नांदेड.

प्रकरण - जन्म नोंद घेणे बाबत.

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार नामे **शेख हबीब अहमद हुसेन** रा.**तळेगाव** ता.उमरी जि.नांदेड यांनी कार्यालयात हजर राहुन जन्म/मृत्यू नोंदणी कायदा २०२३ व सुधारीत शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ अन्वये दिनांक १२/०५/२०२६ रोजी नोंद घेण्यासाठी इ.कि.फौ. अर्ज दि. / / रोजी दाखल केला आहे.

अर्जदार यांची मुलगी नामे **शेख समीर हबीब** यांचा जन्म दिनांक १४/११/२००९ रोजी झाल्याची नोंद मौ. **तळेगाव** ता.उमरी जि.नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधीतास कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांच्या जन्माची/मृत्युची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी लेखी आक्षेप या कार्यालयास सदर जाहीर प्रगटनापासून १५ दिवसाच्या आत सादर करावा, नंतर प्राप्त होणाऱ्या आक्षेपाचा विचार केल्या जाणार नाही १५ दिवसात आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

दिनांक- / /
स्थळ-उमरी
स्वाक्षरित/-
तहसिलदार उमरी

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**
Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक-०४/०६/२०२६
**(जन्म मृत्यू शाखा)**

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री.गणेश लोकडु कौसल्ये रा.सिरसी बु. ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.प्रविण गणेश कौसल्ये रा.सिरसी बु. ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव प्रविण गणेश कौसल्ये रा.सिरसी बु. ता.कंधार या ठिकाणी दिनांक १२/०५/२०१० या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करीता सदर तहसिल कार्यालय कंधार येथे दिनांक २१/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- ०४/०६/२०२६
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**
Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक-०४/०६/२०२६
**(जन्म मृत्यू शाखा)**

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री.रामदास पिराजी कदम रा.औराळ ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.पिराजी रघुनाथ कदम रा.औराळ ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव पिराजी रघुनाथ कदम रा.औराळ ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०८/०३/२०२५ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करीता सदर तहसिल कार्यालय कंधार येथे दिनांक २९/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- ०४/०६/२०२६
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

---

## जाहीर प्रगटन

तहसिलदार उमरी तथा तालुका दंडाधिकारी उमरी यांचे न्यायालयात
इ.कि.फौ.अर्ज.क्र./२०२५
श्री/श्रीमती **शेख हबीब अहमद हुसेन**
विरुध्द

ग्राम पंचायत अधिकारी,ग्रामपंचायत कार्यालय **तळेगाव** ता.उमरी जि.नांदेड.

प्रकरण - जन्म नोंद घेणे बाबत.

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार नामे **शेख हबीब अहमद हुसेन** रा.**तळेगाव** ता.उमरी जि.नांदेड यांनी कार्यालयात हजर राहुन जन्म/मृत्यू नोंदणी कायदा २०२३ व सुधारीत शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ अन्वये दिनांक १२/०५/२०२६ रोजी नोंद घेण्यासाठी इ.कि.फौ. अर्ज दि. / / रोजी दाखल केला आहे.

अर्जदार यांची मुलगी नामे **शेख फिजा हबीब** यांचा जन्म दिनांक २०/०८/२००८ रोजी झाल्याची नोंद मौ. **तळेगाव** ता.उमरी जि.नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधीतास कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांच्या जन्माची/मृत्युची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी लेखी आक्षेप या कार्यालयास सदर जाहीर प्रगटनापासून १५ दिवसाच्या आत सादर करावा, नंतर प्राप्त होणाऱ्या आक्षेपाचा विचार केल्या जाणार नाही १५ दिवसात आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

दिनांक- / /
स्थळ-उमरी
स्वाक्षरित/-
तहसिलदार उमरी

# पाण्यासाठी वन्य जीवांची मानवी वस्त्यांकडे धाव;नागरिकांमध्ये दहशत

## वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या विरोधात शेतकरी संघटनेचा संताप

हदगाव/प्रतिनिधी-जून महीना लागला असला तरी उन्हाळ्याच्या तीव्र झळा आणि जंगलातील नैसर्गिक जलस्रोत आटल्याने वन्यजीवांनी आता गाव व शहरांकडे मोर्चा वळविल्याचे चित्र हदगाव तालुक्यात पाहायला मिळत आहे. हरीण, नील गाय, मोर, ससा, रान डुक्कर यांसारखे हिंस्त्र वन्यजीव पाण्याच्या शोधात मानवी वस्त्यांकडे धाव घेत असल्यान नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गाव परिसरातील अनेक ठिकाणी शेतपिकांचे नुकसान होत असल्याने शेतकरी चिंतेत सापडले आहेत. या संदर्भात शेतकरी संघटनेचे प्रल्हाद राजाराम सूर्यवंशी यांनी दि. ११ जून रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी, हदगाव यांना दिलेल्या निवेदनात ही गंभीर बाब मांडली आहे.

निवेदनानुसार, जून महिन्यात तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे गेल्याने जंगलातील बहुतांश नैसर्गिक जलस्रोत आणि जलाशय कोरडे पडले आहेत. परिणामी वन्यजीवांना पाण्यासाठी जंगलाबाहेर पडण्याची वेळ आली असून अनेक गावांच्या परिसरात त्यांची वर्दळ वाढली आहे.वन्यजीवांच्या वाढत्या हालचालीमुळे मानव-वन्यजीव संघर्षाची शक्यता वाढली असून वन्यप्राण्यांच्या शिकारीचा धोका देखील निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर वन विभागाने जंगलात कृत्रिम जलकुंड उभारून वन्यजीवांसाठी पाण्याची उपलब्धता तातडीने सुनिश्चित करावी, अशी मागणी ग्रामीणांनी केली आहे. तज्ज्ञांच्या मते, जलस्रोतांचे संवर्धन आणि उन्हाळ्यात पाण्याची व्यवस्था केल्यास ही समस्या मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह शेतकरी संघटनेच तालूका अध्यक्ष प्रल्हाद सूर्यवंशी यांनी निवेदनात वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयाच्या कार्यपद्धतीवरही नाराजी व्यक्त केली आहे. हदगाव शहराजवळ वनपरिक्षेत्र कार्यालयासाठी जागा उपलब्ध असताना हे कार्यालय शहरापासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर राष्ट्रीय महामार्गालगत आबळा गावाच्या हद्दीत उभारण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. वन्यजीवांचे संरक्षण आणि ग्रामीणांच्या सुरक्षेसाठी वन विभागाने तातडीने ठोस उपाय योजना कराव्यात, अन्यथा भविष्यात मानव-वन्यजीव संघर्ष अधिक तीव्र होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी नागरिकांना कधीही उपलब्ध होत नसल्याचा आरोप करत, पर्यावरण संवर्धन, वृक्षलागवड जनजागृती तसेच वनविषयक उपक्रम तालुक्यात क्वचितच दिसून येत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

### विद्यमान आमदाराकडे मागणी

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर वृक्ष लागवड, पर्यावरण संवर्धन आणि वन्यजीव संरक्षणाबाबत जनजागृती करण्यासाठी वनविभाग सक्रिय व्हावा, तसेच संबंधित अधिकाऱ्यांना नागरिकांशी संपर्कात राहण्याच्या तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी खंदारे हे कोणत्या साईडवर असतात हलचल रजिस्टर मेंटनस करतात का, एकदा तरी त्यांचा चेहरा इथल्या वृक्षप्रेमी नागरिकांना, पर्यावरणवादी सामाजिक कार्यकर्ते व स्थानिक पत्रकारांना दाखवण्याची सूचना संबंधित विभागाकडे करावी, अशी मागणी हदगाव विधानसभा क्षेत्राचे आ.बाबुराव कदम कोहळीकर यांच्याकडेही शेतकरी संघटनेने निवेदनाद्वारे केली आहे.

# सोलर मीटर बदलण्यासाठी ग्राहकाची महावितरणकडे फरफट!

माहूर/प्रतिनिधी-ग्राहकांकडून वीजबिल वसुलीत तत्पर असलेल्या महावितरणचा कारभार मात्र तक्रारींच्या निवारणाबाबत किती ढिसाळ आहे, याचे उदाहरण वाई बाजार येथे समोर आले आहे. जळालेले सोलर वीजमीटर बदलण्यासाठी एका ग्राहकाला तब्बल अडीच महिने प्रतीक्षा करावी लागत असून महावितरणच्या हलगर्जीपणामुळे संबंधित कुटुंबाला नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. वाई बाजार येथील हारून अकबानी यांचे घरगुती सोलर वीजमीटर शॉर्टसर्किटमुळे पूर्णपणे जळून निकामी झाले. याबाबत त्यांनी २७ मार्च रोजी महावितरण शाखा कार्यालय, वाई येथे लेखी अर्ज सादर करून नवीन मीटर बसविण्याची मागणी केली होती. मात्र अर्ज देऊन अडीच महिने उलटले तरी अद्याप मीटर बदलण्यात आलेले नाही. मीटर जळाल्यानंतर घरातील वीज व्यवस्थेवर परिणाम झाला असून दैनंदिन कामकाजात मोठ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत. वारंवार पाठपुरावा करूनही महावितरणकडून केवळ आश्वासने दिली जात असल्याचा आरोप संबंधित ग्राहकाने केला आहे.एकीकडे वीजबिल भरण्यास उशीर झाला तर ग्राहकांवर कारवाई केली जाते, तर दुसरीकडे ग्राहकांच्या अडचणींकडे मात्र महावितरणचे अधिकारी दुर्लक्ष करत असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# कासारपेठ येथे हातभट्टी दारुवर पोलिसांची धाड;२५ हजारांचा मुद्देमाल नष्ट

माहूर/प्रतिनिधी-माहूर पोलिसांनी अवैध हातभट्टी दारूविरोधात पुन्हा एकदा मोठी कारवाई करत मौजे कासारपेठ येथील शेतातील गोठ्यासमोरील लिंबाच्या झाडाखाली साठवून ठेवलेले हातभट्टी दारू निर्मितीसाठीचे साहित्य जप्त करून नष्ट केले. या कारवाईत सुमारे २५ हजार रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला असून संबंधित शेतमालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार भोंडवे यांच्या आदेशानुसार पोलीस निरीक्षक देविदास चोपडे अवैध धंद्यांविरोधात विशेष मोहीम राबवत आहेत. गुप्त माहितीच्या आधारे दि.११ रोजी दुपारी सुमारे १२.३० वाजता कासारपेठ येथील शेतात धाड टाकण्यात आली.धाडीत हातभट्टी दारू तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या प्लास्टिक टाक्या, मोहफुले, रसायने व इतर साहित्य आढळून आले. पोलिसांनी तत्काळ सर्व साहित्य नष्ट करून संबंधित शेतमालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. दोन दिवसांपूर्वी पापलवाडी येथेही अशाच प्रकारची मोठी कारवाई करण्यात आली होती. पोलीस निरीक्षक देविदास चोपडे स्वतः गावागावांत जाऊन अवैध दारूविरोधात जनजागृती करत असून, नव्या कायद्यानुसार गावात हातभट्टी दारू आढळल्यास पोलीस पाटील, सरपंच व ग्रामसेवक यांनाही जबाबदार धरून कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल पवन राऊत यांनी फिर्याद दिली असून, पोहेका प्रकाश गेडाम, सागर डरंगे, ज्ञानोबा खंदाडे यांनी कारवाईत सहभाग घेतला. पोहेका पुष्पा पुसनाके यांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास माहूर पोलीस करीत आहेत.

# ईशान्य भारतातून सशस्त्र दल कायदा मागे,केंद्र सरकारचा मोठा निर्णय

नवी दिल्ली : एक दोन राज्य वगळता संपूर्ण ईशान्य भारतातून सशस्त्र दल विशेष अधिकार कायदा (AFSPA) पुढील वर्षी मागे घेतला जाईल, असे विधान केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले आहे.

आसाम-नागालँड सीमावर्ती भागात खनिज तेल उत्खनन सुलभ करण्यासाठी केंद्र सरकार, आसाम आणि नागालँड यांच्यात झालेल्या त्रिपक्षीय सामंजस्य करारावर स्वाक्षरी करताना अमित शहांनी याबाबत मोठे विधान केले आहे. या करारामुळे आसाम आणि नागालँड भागात खनिज तेल वाहतूक तसेच, हाताळणीला मदत होणार आहे. अफस्पा अंतर्गत येणारे क्षेत्र कमी होणे हे शांततेचे प्रतिक असल्याचे अमित शाह यावेळी म्हणाले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले की, प्दुअच्या वर्षी एक-दोन राज्ये वगळता संपूर्ण ईशान्य भारतातून अफस्पा कायदा मागे जाईल.

वादग्रस्त आसाम नागलँड सीमाभागातून तेल आणि खनिज उत्खनन आणि वाहतूक सुलभ करण्यासाठी हा करार अत्यंत महत्वाचा होता. ईशान्य भारताचा विकासाचा मानस पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेकवेळा बोलून दाखवला आहे.

# देगलूरात मोफत नवीन पाठ्यपुस्तक वितरणाला वेग

देगलूर/प्रतिनिधी-नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीपूर्वीच देगलूर तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या हाती मोफत पाठ्यपुस्तके पोहोचवण्याच्या हालचालींना वेग आला आहे. शासनाच्या मोफत शालेय पाठ्यपुस्तक वितरण योजनेअंतर्गत गटसाधन केंद्र देगलूरमार्फत तालुक्यातील १२ केंद्रांना पहिल्या टप्प्यातील पुस्तकांचे वितरण गटशिक्षणाधिकारी बालाजी गोडाजी यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले आहे.

गटसाधन केंद्राने पहिल्या टप्प्यासाठी १७ हजार ८२८ पाठ्यपुस्तकांची मागणी नोंदवली होती. त्याविरुद्ध १८ हजार २१ पुस्तके प्राप्त झाल्याने ३९३ पुस्तकांचा जादा साठा उपलब्ध झाला आहे. त्यामुळे इयत्ता पहिली, तिसरी, चौथी, पाचवी, सातवी आणि सहावीसाठी आवश्यकतेनुसार किंवा त्याहून अधिक प्रमाणात पुस्तके उपलब्ध झाली आहेत. इयत्ता सहावीसाठी तर गरजेपेक्षा १२६ पुस्तके अधिक मिळाली आहेत. मात्र इयत्ता दुसरीसाठी ५१ आणि इयत्ता आठवीसाठी २१६ पुस्तकांची तूट असल्याचे चित्र आहे. शिक्षण विभागाने उर्वरित पुस्तके उपलब्ध होताच संबंधित केंद्रांना तातडीने पुरवठा केला जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. केंद्रनिहाय वितरणात भटगल्ली केंद्राने बाजी मारली असून, येथे सर्वाधिक ५ हजार ०४३ पाठ्यपुस्तके वितरित करण्यात आली आहेत. त्यापाठोपाठ हणेगावला २ हजार ३२६, वन्नाळीला २ हजार ०२८, मानूरला १ हजार १६२ आणि कावळगावला १ हजार १२५ पुस्तके देण्यात आली आहेत.



शेतकरी कर्जमाफीतील जाचक अटी रद्द कराव्यात, सर्व राबणाऱ्या शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा, देवस्थान जमीन विधेयकावरील स्थगिती उठवून देवस्थान इनाम जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावे त्वरित कराव्यात तसेच माहूर तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना पीकविमा मंजूर करून वाटप करावा, या प्रमुख मागण्यांसाठी माकप व अ. भा.किसान सभेच्या वतीने गुरुवारी माहूर तहसील कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. या आंदोलनात अ.भा. किसान सभेचे राज्य सहसचिव कॉ. शंकर सिडाम, जिल्हा सचिव कॉ. किशोर पवार, कॉ. संजय मानकर, कॉ. डॉ.बाबा डाखोरे यांच्यासह इतर दिडशेहून अधिक कार्यकर्ते उपस्थित होते.


# कार्यालय नगरपरिषद,लोहा जि.नांदेड.

ई मेल-mcloha18@gmail.com फोन नं.:-०२४६६-०२४२५६२

जा.क्र./नपलो/स्व.वि./घ.व्य.नि.२०२६/ /२०२६ दिनांकः-१२/०६/२०२६

## सार्वजनिक प्रसिद्धी सूचना/जाहीर आवाहन
## घनकचरा व्यवस्थापन नियम,२०२६ अंतर्गत

**'बल्क वेस्ट जनरेटर्स' (BWGs) यांची नोंदणी, स्वयं-मूल्यांकन व ४-स्तरीय कचरा वर्गीकरणाबाबत सूचना**

सर्व नागरिक, गृहनिर्माण संस्था, व्यावसायिक संकुले, हॉटेल्स, मंगल कार्यालये, रुग्णालये, शासकीय/खासगी संस्था यांना कळविण्यात येते की, केंद्र शासनाच्या घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार लोहा नगर परिषद हद्दीत घनकचरा व्यवस्थापन नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने नगरपंचायत हद्दीतील खालील संस्था/आस्थापना 'बल्क वेस्ट जनरेटर्स' (BWGs) म्हणून ग्राह्य धरल्या जातील.

- दररोज १०० किलो किंवा त्यापेक्षा अधिक घनकचरा निर्माण करणाऱ्या संस्था.
- २०,००० चौ.मी. किंवा त्यापेक्षा अधिक क्षेत्रफळ असलेल्या इमारती/गृहनिर्माण संस्था.
- हॉटेल्स, मॉल्स, रुग्णालये, विवाह कार्यालये, शैक्षणिक संस्था, व्यापारी संकुले इत्यादी संबंधित सर्व बल्क वेस्ट जनरेटर्सना पुढील सूचना देण्यात येत आहे.

**१. स्वयं-मूल्यांकन अहवाल सादर करणे.**

सर्व (BWGs) यांनी आपल्या संस्थेतील कचरा निर्मिती, वर्गीकरण व प्रक्रिया याबाबतचे स्वयं मूल्यांकन (Self-Evaluation) करुन अहवाल लोहा नगरपरिषदेस सादर करावा.

**२.४ - स्तरीय कचरा वर्गीकरण अनिवार्य :**

कचरा उगमस्थानी पुढील ४ स्वतंत्र प्रकारांमध्ये वर्गीकृत करणे बंधनकारक राहील.

-ओला कचरा - सुका कचरा
-घरगुती घातक कचरा - सॅनिटरी कचरा

**३. स्वतंत्र संकलन व्यवस्था :**

वर्गीकृत कचरा स्वतंत्र स्वरुपात नगरपरिषद कचरा संकलन वाहनांकडे सुपूर्द करणे आवश्यक राहील.

**४. नियमांचे पालन न केल्यास :**

घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ अंतर्गत संबंधितांवर दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात येईल. सदर सूचना सर्व संबंधित संस्था,गृहनिर्माण संस्था व नागरिकांनी गांभीर्याने घ्यावी व नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

| स्वा/- | स्वा/- | स्वा/- |
|---|---|---|
| **संदिप भोळे** | **करीम शेख** | **शरद पवार** |
| मुख्याधिकारी | उपनगराध्यक्ष | नगराध्यक्ष |
| नगर परिषद लोहा | नगर परिषद लोहा | नगर परिषद लोहा |


# किनवट न्यायालय आवारात कायदे विषयक जनजागृती शिबिर




किनवट/प्रतिनिधी-तालुका विधी सेवा समिती आणि अभिवक्ता संघ किनवट यांच्या संयुक्त विद्यमाने ११ जून रोजी न्यायालय आवारात कायदे विषयक जनजागृती शिबिर संपन्न झाले. अध्यक्षस्थानी न्यायाधीश तथा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष पी.एम.माने हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून वकील संघाचे अध्यक्ष ॲड.किशोर मुनेश्वर हे उपस्थित होते.

शिबिरात विविध कायदे, सार्वजनिक सेवा सुविधा तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांविषयी उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी ॲड.दीपा सोनकांबळे यांनी नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या सार्वजनिक सेवा सुविधा, त्यांचा लाभ घेण्याची प्रक्रिया आणि कायदेशीर बाबी याविषयी सविस्तर माहिती दिली. ॲड.सचिन दारवंडे यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या विविध शासकीय सेवा-सुविधा, त्यांच्या संरक्षणासाठीचे कायदे आणि हक्क याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन ॲड.सम्राट सर्पे यांनी केले. अध्यक्षीय समारोपपर भाषणात न्यायाधीश पी.एम.माने यांनी कायद्याचे ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक असून अशा शिबिरांमुळे नागरिकांमध्ये कायदेविषयक जागरूकता वाढण्यास मदत होत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी ॲड.सचिन गिम्मेकार यांनी उपस्थित मान्यवर, आयोजक आणि सहभागींचे आभार मानले. कार्यक्रमास वकील, पक्षकार, नागरिक, न्यायालयीन कर्मचारी, पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

पान १ वरुन

### मोदींच्या १२ वर्षांच्या कामगिरीचे...

प्रकल्प, धरणे, मेट्रो, बंदरे आणि औद्योगिक गुंतवणुकीमुळे विकासाला चालना मिळाली असून १०० हून अधिक सिंचन प्रकल्प पूर्ण झाले आहेत. देशातील सर्वाधिक परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात आली असून जीएसटी संकलनातही राज्य अव्वल स्थानावर असल्याचे त्यांनी सांगितले. गडचिरोली स्टील सिटी, अमरावती टेक्सटाईल पार्कसह विविध औद्योगिक प्रकल्पांमुळे रोजगारनिर्मितीला गती मिळणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### अविश्वासाचा अर्ज जिल्हाधिकाऱ्यांकडे...

प्रकल्पाचे गाजरं दाखविणाऱ्यांनी मुदत ठेव ठेवण्याचे कारण काय? एफडीसाठीच जमीन विकली का?, जमीन विक्री कांडातील काही संचालक आता सभापतींच्या भ्रष्टाचाराविषयी घसा कोरडा पडेपर्यंत बोलतात तेव्हा जमीन विक्री कांडाचीही चौकशी झाली पाहिजे, कारण ही रक्कम संचालकांच्या वैयक्तिक मालकीची नव्हे तर तमाम शेतकऱ्यांच्या घामाच्या पैशाची असून ते पुर्णपणे हक्कदार असल्याच्या लोकप्रतिक्रीया बोलक्या झाल्या आहेत.

### शेतकऱ्याला नवा बैल...

जुंपून शेती करावी लागल्याचे पाहून सर्वांनाच वाईट वाटले. त्यानंतर मदतीसाठी दुसरा बैल देण्यात आला. मात्र तो योग्य नसल्याची माहिती मिळताच लातूर जिल्हाधिकाऱ्यांना तात्काळ निर्देश दिले असून संबंधित शेतकऱ्याला योग्य व सक्षम बैल उपलब्ध करून देण्यात येईल.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४